नियमीत फौजदारी खटला नं.१६१/२०२३
निशानी– ७१/क

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ७ यांची जबानी**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – महेश बाबासो कांबळे

वय वर्षे - ३२

व्यवसाय – मटण शॉप

राहणार - वडगांव रोड, पेठ वडगांव ता.हातकणंगले

**सरतपास सरकारी वकील व्ही.पी.कुसुरकर, यांचे मार्फत**

दि.०५/०२/२०२३ रोजी मी कॅरीबॅग घेणेकरीता गेलो असता तेथे काय घडले हे मला माहीत नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकीलांनी यास उलटतपास सदृश्य सुचक प्रश्न विचारणेची परवानगी मागितली. ती देणेत आली.**

वाठार येथे माझे मटणाचे दुकान आहे. कोडोली अर्बन बॅकेसमोर कमाल पटवेगार राहतात. दि.०५/०२/२०२३ रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास मी माझ्या मटण शॉप च्या दिशेने निघालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस कोडोली अर्बन बॅकेसमोर आरडाओरड सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस सुरज नदाफच्या घरासमोर कमाल पटवेगार व शकील नदाफ याच्यामध्ये शाब्दीक भाडण सुरु होते. हे म्हणणे खरे नाही की, काही वेळानंतर त्याच्यामध्ये हातापाई सरु झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस सुरज नदाफ ने कमाल पटवेगारला तुझ्या आईला झवणार सोडणार नाही अशा प्रकारची शीवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, मोठे भांडण होणार व ते सोडविण्याकरीता मी तेथे गेलो होतो. त्यावेळेस तेथे कमाल पटवेगारचा मुलगा जैद तेथे आला होतो व भांडण सोडविण्याचे प्रयत्न केले होते किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस आलिया आणि जोया नदाफ तेथे येऊन त्यांनी कमाल पटवेगारचे कॉलर पकडून हाताने मारहाण सुरु केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर सुरज नदाफ ची पुतणी तबसूम नदाफ तेथे घरातून काठी घेऊन आली होती व कमालच्या पायावर, खांदयावर, डोक्यावर मारहाण करायला सुरुवात केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस फजल ने कमाल पटवेगारच्या तोंडावर हाताने मारहाण करायला सुरुवात केली होती.

हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी व जाधव पान शॉपच्या मालकाने त्याना वेगळे करायचा प्रयत्न केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस फजलने जवळ पडलेली सिमेंटची वीट उचलून कमाल च्या मुलाला मारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे जैदला डाव्या

हाताला लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, अनारकलीने चप्पल घेऊन कमाल ला मारहान केले होते. हे म्हणणे खरे नाही की, शकील नदाफने कमाल पटवेगारच्या पत्नीला तु बाहेर ये, तुला मारुन टाकतो, तुला जिवंत जाळतो अशी धमकी देऊन कमालच्या घराच्या दरवाज्यावर दगड फेक करुन प्रापंचीक व इतर साहीत्याचे नुकसान केले होते. आता मला माझा पोलीसांनी घेतलेला जबाब दाखविण्यात आला. त्यातील मजकूर *" तेव्हा वाठार तळसंदे रोडवर.................. प्रत्यक्ष रित्या पाहीला आहे.* सदरचा मजकूर माझ्या जबाबामध्ये का नमूद आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. त्यास **अधोरेखांकीत भाग अ** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी घटना प्रत्यक्ष पाहीलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आज कोर्टामध्ये येताना माझ्या सोबत सुरज, शकील, फजल नदाफ होते. माझी सुरज, शकील व फजल नदाफ सोबत चांगली मैत्री आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि कमाल पटवेगारचे जास्त बोलणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज सकाळी सुरज, फजल, शकील नदाफ यांनी मला साक्ष देण्याबाबत सांगीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीना मदत करण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटपास आरोपीतर्फे वकील श्री.डी.पी.पाटील यांच्यातर्फे**

हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी व आरोपीमध्ये झालेला वाद प्रत्यक्ष पाहीलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कोर्टामध्ये खोटी साक्ष दिलेली नाही व खोटी साक्ष देण्याकरीता मला कोणी सांगीतले नाही.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-

दि.२५/०२/२०२६

(आर. एस. मोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव